REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 11 | AUGUST - 2025

# शिवकालीन संत माणकोजी बोधले महाराज यांचे सामाजिक-धार्मिक कार्य

संशोधक विद्यार्थी
गितांजली बाळकृष्ण हजारे
इतिहास विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, जि.सोलापूर.

मार्गदर्शक
डॉ.सज्जन उद्धव पवार
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, जि.सोलापूर.

## ➢ प्रस्तावना :



महाराष्ट्र ही संताची मायभूमी मानली जाते. पूर्वी या भूमीस "दंडकारण्य" असे म्हणत.या दंडकारण्यात ऋषीमुनींचा वास होता. जप,तप, योग, जोग ही भगवंत प्राप्तीची साधने होती. परंतु ज्ञानदेवांनी "संस्कृताचे गहणे। मोडोनीया शब्द सोपाने | रचिली निधाने। श्री निवृत्ती देवे ॥ अशी शब्द सोपाने सर्व सामान्य जीवांना खुली केली "आणि मग सर्व ईश्वर निष्ठांची महाराष्ट्रात अवतार परंपरा सुरू झाली.[1] अर्धमाची शिग मोडण्यासाठी व धर्माचे अभ्युत्थान करण्यासाठी संत ज्ञानदेवांनी पाया रचला. नामदेव महाराजांनी किर्तनाचे रंगात नाचून ज्ञानदिप लावले, एकनाथ महाराजांनी सर्वांना एका पंक्तीला जेवायला लावून अस्पृश्य मुलाला उराशी कवटाळले व तुकाराम महाराजांनी अनिष्ट रुढींवर कडाडून टीका करून एक समाज धर्म व मानवधर्म याचा वाळवंटात खेळ मांडला.[2] तुकाराम महाराजांचा वासुदेव टाळ चिपळ्या घेऊन गाऊ लागला. अशा तऱ्हेने समाज प्रबोधनाची एक शुद्ध मालिका निर्माण झाली.

सोलापूर जिल्ह्यामध्ये संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत दामाजीपंत, संत जोगा परमानंद, संतनाथ महाराज, टेकनाथ महाराज आदी संत मंडळींनी समाज उद्धारासाठी व समाज प्रबोधनासाठी आपले मौलिक योगदान दिले. याच संत परपरेच्या मालिकेतील भागवत संप्रदायातील एक महत्त्वपूर्ण संत म्हणून "माणकोजी बोधले" महाराज प्रसिद्ध आहेत.[3] त्यांचे वास्तव्य बार्शी तालुक्यातील धामणगाव (दुमाला )येथे होते. आज धामणगाव ची ओळख बोधले महाराजांचे गाव म्हणून आहे. संत माणकोजी बोधले महाराज यांचा काळ साधारणतः सतराव्या शतकातील आहे. जोगा परमानंदा नंतर तीनशे वर्षांनी बार्शी परिसरात बोधले महाराज होऊन गेलेले संत होय.[4]

महिपतीबुवांनी लिहून ठेवलेल्या संत चरित्राच्या पोथीमध्ये बोधले महाराजांचा अध्याय आलेला आहे.[6] 1852 साली शिवरामात्माजींनी 'बोधलिलांबरी' नावाचा ग्रंथ लिहिला आणि यामुळेच बोधले महाराजांचे संपूर्ण चरित्र उपलब्ध झालेले आहे. या ग्रंथात 25 अध्याय असून त्यामध्ये 5246 ओव्या आहेत. प्रत्येक अध्यायात 200 ते 300 ओव्यांचा समावेश आहे. सकलसंत गाथांमध्ये काशिनाथ अनंत जोशी यांनी भाग एक मध्ये बोधले महाराजांचे चरित्र व त्यांचे 110 अभंग दिलेले आहेत कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या काव्यात त्यांचा उल्लेख येतो तसेच लोकगीतांमधून ओव्यांमधून बोधले महाराजांचा उल्लेख मिळतो.[5] प्रस्तुत संशोधनामध्ये संत माणकोजी बोधले महाराजांच्या सामाजिक, धार्मिक कार्याचा, त्यांच्या शिकवणुकीचा आढावा घेण्यात आला आहे.

### संशोधनाची उद्दिष्टे :

१. संत माणकोजी बोधले यांच्या जीवन आणि कार्याचा अभ्यास करणे.
२. संत माणकोजी बोधले यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अभ्यासणे.
३. संत माणकोजी बोधले यांच्या धार्मिक योगदानाविषयी चिकित्सक अभ्यास करणे.
४. तत्कालीन सामाजिक सुधारणा आणि परिवर्तन निदर्शित करणे .

### ➢ संत बोधले महाराजांचे जीवन चरित्र :

संत माणकोजी बोधले यांचे वडील भानाजी जगताप होते. ते मूळचे पुण्याजवळील सासवडचे राहणारे होते. त्यांची कुलस्वामिनी तुळजापूरची तुळजाभवानी. कालांतराने सासवड गावी प्रचंड मोठा दुष्काळ पडला. अन्न पाणी न मिळाल्यामुळे मनुष्य प्राण्यांची दुर्दशा सुरू झाली. दुष्काळ पडल्यानंतर, बार्शीत भगवंताचे दर्शन घेऊन मार्गक्रमण करीत असताना, मोठे वादळ सुरू झाले सोसाट्याचा वारा व पाऊस सुरू झाला. देवी तुळजाभवानीचे दर्शन घेण्यासाठी तुळजापूरला जात असताना नागझरी नदीला आलेल्या पुरामुळे त्यांचा मुक्काम धामणगावला पडला. स्थानिक धर्मेश्वराच्या प्राचीन मंदिरावरून या गावास धर्मण्यपूर असे नाव पडले. त्याचा अपभ्रंश झाला "धामणगाव".

भानाजीस कळले जवळच धर्मण्य नावाचे गाव आहे. धर्मण्य गावी जाऊन आपल्या झोपड्या बांधून प्रजेसह त्यांनी वास्तव्य केले. पुढे भाणजी पाटील यांनी सरकारात जाऊन ग्रामअधिकार करून घेतला. धामणगाव वसवून आनंदाने राहू लागले. धामणगाव हे मराठवाड्याच्या सीमेवर आहे.[6]

त्यावेळेस भिकाजी पाटील यांच्याकडे धामणगावची पाटीलकी होती; त्यांना मुलगा नव्हता म्हणून त्यांनी भानाजींना आपल्याकडे ठेवून घेतले आणि त्यांना आपली पाटीलकी दिली. भानाजी व पार्वती यांचे पोटी माणकोजी महाराज यांचा जन्म १६०४ मध्ये झाला आणि हेच पुढे श्री संत माणकोजी बोधले म्हणून नावारूपास आले.[7]

### ➢ संत माणकोजी बोधले यांना झालेला पंढरपूरच्या विठ्ठलाचा साक्षात्कार :

संत माणकोजी यांच्या मोठ्या बंधूचे नाव 'शिवाजी'. शिवाजी हे 'पंढरीचे वारकरी' तर माणकोजी हे 'युद्धकलेत तरबेज धारकरी' होते. माणकोजी यांनी काही रांगडे तरुण जमा केले आणि त्यांना युद्धाचे शिक्षण देऊन तत्कालीन मुस्लिम राजवटीच्या अन्यायाविरुद्ध लढा सुरु केला. अत्याचारी राजवटीला हुसकावून लावले आणि पंचक्रोशीत त्यांची स्वतःची सत्ता

स्थापन केली. संत माणकोजी बोधले यांचे मोठे बंधू शिवाजी दरवर्षी वारीला जात असत. त्यामुळे माणकोजींनी त्यांना अनेक प्रश्न विचारले की "तू यात्रेला का जातो"? त्यानंतर त्यांचे बंधू शिवाजी यांनी संत माणकोजींना विठ्ठल आणि पुंडलिकाच्या गोष्टी सांगितल्या आणि आर्त मनाने विठ्ठलाला साद घातली तर विठ्ठल आपल्या मदतीला धावून येतो; हे ऐकल्यानंतर संत माणकोजीनी पंढरपूरला जाण्याचा हट्ट धरला. मोठ्या भावाबरोबर ते पंढरपूरला गेले, तिथे संत माणकोजी विठ्ठलाच्या भजनात दंग होऊन "**उचलोणी घेई कडी मजबापा**" असा बाल हट्ट त्यांनी पांडुरंगाला केला. जोपर्यंत पांडुरंग भेटणार नाही; तोपर्यंत मी इथून हलणार नाही. तेथेच माणकोजी ध्यानस्थ राहिले, देहभान हरपून स्वस्थ बसले, **मन रंगले श्रीहरी चरणी** या उक्ती प्रमाणे माणकोजींची ब्रह्मानंदी टाळी लागली.

14 दिवस अहोरात्र ध्यानस्थ बसलेल्या माणकोजींना पाहून विठ्ठलाला दया आली आणि रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी विठ्ठल स्वतः धावून आले आणि त्यांनी आपले मूळ रूप प्रकट केले. ते रूप पाहताच त्यांनी लागलीच विठ्ठलाचे पाय धरले ते पांडुरंगाचे तेजस्वी रूप डोळ्यात साठवून विठ्ठलाला बोलाविण्यासाठी ते पंढरपूरला आले होते, पण विठ्ठलाचे रूप पाहून त्यांचे दर्शन घेऊन, माणकोजी आपण नेमके कशासाठी आलो होतो हेच विसरले; त्यांच्या मनातील घालमेल विठ्ठलाच्या लक्षात आली आणि विठ्ठलाने त्यांना आलिंगन देऊन रखुमाई पाशी नेले तेव्हा रखुमाईने त्यांना ममतेने कुरवाळले. विठ्ठलाने रखुमाई समवेत मानकोजींना परम-आध्यात्मिक ज्ञानाचा बोध केला; त्यामुळे "बोधिले" या शब्दाचा अपभ्रंश बोधले असा झाला, म्हणून जगताप पाटील घराणे असूनही माणकोजीस बोधले हे नाव पडले व पुढे याच नावाने ते प्रसिद्ध झाले.

यानंतर माणकोजींच्या हट्टामुळे देव धामणगावला आले. दोन दिवस माणकोजींबरोबर राहिले. जाताना देवांनी माणकोजीला एक सुंदर मूर्ती दिली आणि आश्वासन दिले की तू बोधला आहेस, "मला तुझ्याजवळ सदैव राहणे शक्य नाही परंतु तू जेव्हा इच्छा धरशील तेव्हा मी सदैव तुझ्या जवळच आहे; आज पासून धामणगाव म्हणजे पंढरपूर आणि ही जवळची नागझरी (शेषझरी) नदी म्हणजे चंद्रभागात समज" असे सांगून विठ्ठल अंर्तर्धान पावले तेव्हापासून धामणगावला धाकटे पंढरपूर असे म्हटले जाते.[८]

तेव्हापासून त्यांनी स्वतः आपल्या गोडवाणीतून कीर्तन करायला सुरुवात केली आणि नवनवीन अभंग रचना तयार करून कीर्तन करू लागले आणि माणकोजी विठ्ठलमय झाले. आता त्यांची कीर्ती सर्व दूर पसरली होती. संत माणकोजी बोधले यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांवरून व त्यांच्या सामाजिक कार्यातून सामान्य माणसाच्या बाबतीत असलेली करुणा त्यांनी केलेल्या एकूण 110 अभंग रचना द्वारे दिसून येते.

**नव्हे नर नव्हे नार नाही तेथे कोणी ॥**
**कुरकून गेले साबले मग हार पळली दोन्ही ॥१ ॥**
**बोधला म्हणे सांडी वाद वाचा करीसी सिण ॥**
**आत्मा तुम्हा एकपणा कैसे भिनाभीन ॥२ ॥ (स. सं. गा. अ.क्र. ६०)** [1]

स्त्री किंवा पुरुषाने ईश्वरचरणी लीन होऊन नतमस्तक झाल्यानंतर ईश्वर कृपा मिळणारच उच्चनीच कोण असा वाद घालत बसण्यापेक्षा ईश्वराची भक्ती करावी वाद घालून त्यातून निष्पन्न काहीच होणार नाही. असे बोधले महाराज सांगतात. स्त्री पुरुष दोन्ही समान असून त्यांच्यामध्ये फरक करण्यापेक्षा ईश्वर भक्ती दोघांनीही करावी असे बोधले महाराज सांगतात त्यांचा हा

विचार सद्यस्थितीला सुद्धा उपयोगी पडताना दिसतो. बोधले महाराजांनी आपल्या अभंगाद्वारे समाजातील बुवाबाजीवर देखील हल्ला करत, भोंदू लोक सामान्य लोकांना कसे फसवतात त्याबद्दल देखील जनजागृती केलेली आहे. अशा रीतीने त्यांनी आपल्या अभंगातून समाजातील अनेक गोष्टींवर कडाडून प्रहार केला व रोजच्या जीवनातील उदाहरणाद्वारे व अनुभवांच्या आधारे त्यांनी आपल्या अभंगातून समाजाला दिशा देण्याचे काम केलेले आहे. मोहमायाजालातून मुक्त होऊन अगदी सहज सोप्या पद्धतीने केवळ ईश्वरभक्ती करून जीवन जगण्याचा त्यांनी उपदेश केलेला दिसून येतो.[७]

## ➢ संत माणकोजी बोधले महाराजांचे धार्मिक- आध्यात्मिक कार्य :

न्यायमूर्ती रानडे म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे मोठे कार्य केले त्याची पार्श्वभूमी मराठी संतानी तयार केली होती जाती-जाती मधील विषमता नाहीसी करून ऐक्य भावनेचा संतांनी महाराष्ट्राची भूमी नांगरूण तयार केली. प्राचीन काळापासून संत हा शब्द लोककल्याणकारी अशा थोर पुरुषासाठी वापरण्यात आला.[3] संत हा शब्द सतूचे अनेकवचन आहे. संत म्हणजे चांगले किंवा चांगलेपणा तत्कालीन संत समाजामध्ये कीर्तन, प्रवचन यांच्या माध्यामातून प्रबोधनाचे काम करत मुस्लीम अत्याचाराखाली मराठी समाजाची अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी लोकसेवेच्या माध्यमातून त्यांनी कार्य केले. त्यांच्या कालखंडामध्ये औरंगजेब बादशहाचे राज्य सुरु होते; औरंगजेबाने विजापूर जिंकून तेथून राज्यकारभार सुरु केला होता.[8] सुलतान राजवट सुरु झाल्यामुळे हुकूमशाही व बळजबरीने राज्य चालवित होते. या आक्रमकांनी हिंदूचा धर्म नष्ट करण्याचा मनसुबा चालविला होता. कोण व कोठेही हिंदू भेटला त्याला तेथे अत्याचार करून मुस्लीम धर्माची दिक्षा देवून धर्मांतर करवीत. याप्रमाणे सगळीकडे दहशतीमुळे लोक गाव सोडून गेले. साधू, भिक्षुक लोक यांना सुलतान बादशहा कैद करून त्यांच्या धर्माची दिक्षा देत असे. तसेच माणकोजी बोधले महाराजांना बादशहाने त्याच्या समशेर अली सरदाराव्दारे, कैद करून नेले व त्यांचे धर्मांतर करण्यासाठी खूप प्रयत्न केले. बोधले महाराजांनी भक्तिरूपी तेज दाखविल्यामुळे बादशहाचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. त्यांनी औरंगजेब बादशहांने देखील त्यांना हिंदू पीर अशी पदवी दिली व गुरु मानले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा माणकोजी महाराजांना गुरु मानले होते.[9] बोधले महाराज पंढरपूरचे निष्ठावंत वारकरी होते त्यांना विठूरायाने एकांती बोध केला म्हणून “बोधले” नाव पडले. आद्यशंकराचार्य विरूपाक्ष भारती यांनी स्वत: धामणगावी येऊन उपदेश दिला आहे. त्यामुळे औरंगजेब बादशहाचे गर्वहरण करून हिंदू धर्म वाचविला व वारकरी संप्रदायाचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशात केले. [10]

## संत माणकोजी बोधले महाराजांचे सामाजिक कार्य आणि समाजप्रबोधन :

परंडा प्रांतांतातील अब्दुल खानाचा उद्धार केला. दुष्काळत स्वतःची पेवे लुटवले व व्याजाने पैसे काढून रांतजन तहसिलात कर शेतसारा भरला. एकदा त्यांची पांडूरंगानी परीक्षा घेण्याचे ठरविले. त्यानुसार पांडुरंगांनी मलंग फकीराचा वेश घेऊन महाराजांच्या घरी जाऊन त्यांच्या सुनबाई भागीरथी यांना दान म्हणून मागितले व त्यांनी सुनबाईस दान केले. “सर्व भूती द्यावे अन्न” या संत तुकाराम महाराज यांची उक्तीप्रमाणे आपल्या सर्व संसाराचे दान केले, पेवे लुटवले. समाजाच्या उभारणीत अनमोल योगदान केले. असमान जातीव्यवस्थेत लोकांची मने मलीन झालेली होती. त्यामुळे प्रत्येकास प्रत्येकाविषयी द्वेशभाव अहंभाव असे वाईट गुण त्यांच्यातून दूर करून समाज सुधारण्यासाठी किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून त्यांनी एक आगळा वेगळा परमार्थ व समाजासाठी प्रबोधन करून उत्तमपासून अंत्यजापर्यंत सर्वांना एका पातळीवर आणण्याचे कार्य संत

माणकोजी बोधले महाराजांनी केले.[11] संत माणकोजी बोधले महाराजांनी शके इ.स. 1694 जेष्ठ वैद्य तृतीया रोजी धामणगाव येथे संजीवन समाधी घेतली. आजतागायत या घटनेला 329 वर्षे पूर्ण झाली. धामणगावामध्ये सापडलेल्या 1774 साली लिहिलेल्या “बोधलिलांबरी” नावाच्या बखरीद्वारे शिवकालीन संत माणकोजी बोधले हे छत्रपती शिवराय व औरंगजेब बादशहा यांचे अध्यात्मिक गुरु असल्याचे समप्रमाण सिद्ध होते. [12]

## ➢ समारोप :

संत माणकोजी महाराज हे एक लोकोत्तर प्रबोधनकार होते. त्यांनी एक आगळा वेगळा परमार्थ व जिवंत समाजास प्रबोधन करून गुरू एक शिष्य ही रूढी मोडून व्यक्तीगत मोक्ष व परमार्थ हा विचार न मांडता समाजात मिळून मिसळून जग उद्धार केला. उत्तमपासून अंत्यजापर्यंत सर्वांना एका पातळीवर आणले. संत चरित्रामध्ये लोकांना चमत्कार दिसतात;पण संताकडे चमत्कार दृष्टीने पाहणे चुकीचे आहे.

शिवकालीन कालखंडात माणकोजी बोधले महाराज यांनी केलेल्या कार्यामुळे सकल मानव जातीला जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली. मानवजातीच्या भल्यासाठी आपला देह झिजवल्याचे कार्य संत करत असतात. बोधले महाराजांनी मोठ्या परिश्रमाने विठ्ठलाची भक्ती करून विठुरायाला आपलेसे करून आपल्या निरपेक्ष भक्तीच्या जोरावर संसारातील काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, मोह या षडविकारावर विजय मिळवला आणि सनातन वारकरी धर्माचा प्रसार, प्रचार व सेवा आयुष्यभर केली. शिवकालीन कालखंडात या संतानी मराठी अस्मिता टिकवून ठेवली अशा संताचे कार्य शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेस प्रेरक ठरले.

## ➢ संदर्भ :


1. आवटे हरी,त्र्यंबक सकलसंतगाथा ;इंदिरा छापखाना; २७०, सदाशिव पेठ, पुणे ३०. शके १८४५, सन १९२४, आवृत्ती पहिली . पृ.क्र. 215
2. कुलकर्णी अ.ग., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे. पृ.क्र. 104
3. कुलकर्णी अ.रा. व खरे ग.ह.मराठ्यांचा इतिहास कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे, 2006
4. ढेरे रा.चिं., संत साहित्य व लोकसाहित्य : पुणे 1984 पृ. ४४-४५
5. न्या.म.शो.रानडे मराठी सत्तेचा उत्कर्ष वरदा प्रकाशन प्रा . लि. पुणे २०२३ पृ.क्र. ६३
6. बोधले गोपाळ माळगावकर बोधलिलांबरी बखर1774, धामणगाव 1994, पृ.क्र. 25
7. माळी मा.गो., शिवरायांचे एक गुरु श्री.मौनी महाराज, आशा प्रकाशन, गारगोटी, 1978 पृ.क्र. 7
8. उपरोक्त पृ.क्र.१०
9. शिवपुजे शुभदा,संत माणकोजी बोधले यांचे साहित्य :एक अभ्यास ,सोलापूर विद्यापीठ ,अप्रकाशित पी. एच. डी. प्रबंध २००८, पृ. क्र. १७,२६
10. उपरोक्त पृ.क्र.27
11. समर्थ रामदास, समर्थ प्रताप भारतीय संस्कृती कोशखंड 7 पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७ पृ.क्र. 553
12. ह.भ.प.प्रभाकर बोधले,बोधलिलांबरी, प्रस्तावना धामणगाव 1994, पृ.क्र. IV-V